# जिल्हाधिकारी कार्यालय,जालना

**प्रशासकीय इमारत, स.नं. ४८८, जालना**
**(जिल्हा नियंत्रणक कक्ष)/(आपत्ती व्यवस्थापन)**

दुरध्वनी क्रमांक (02482)-223132 टोल फ्री क्रमांक 1077 फॅक्स क्रमांक (02482)-226477,225326

**E-mail:-** rdcjalna@gmail.com, jalnaddmo@gmail.com **Website:-** www.jalna.nic.in , http://59.90.142.57/ddmajalna


जा.क्र.२०२०/मशाका/जिनिक/आव्यप्र/कावि- दिनांक: १४/०४/२०२०.

**(ई-मेलने/टपालाने)**

आपत्ती प्राधान्य

**वाचा:**

१. साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ खंड २, ३ व ४

२. आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५.

३. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई ३२ यांची अधिसूचना दिनांक १३ मार्च २०२०.

४. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्रमांक करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दिनांक १४ मार्च २०२०.

५. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्रमांक करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दिनांक १६ मार्च २०२०.

६. महाराष्ट्र शासन क्रमांक करोना २०२०/प्रा.क्र.५८/आरोग्य ५ दिनांक १५ मार्च, २०२०.

७. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, मंत्रालय,मुंबई-३२ यांचे अधिसूचना क्र.डिएमयु/२०२०/सिआर-९२/DisM-१/दिनांक २५/०३/२०२०.

८. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, मंत्रालय,मुंबई-३२ यांचे अधिसूचना क्र.डिएमयु/२०२०/सिआर-९२/DisM-१/दिनांक १३/०४/२०२०.

९. या कार्यालयाचे मुदतवाढ आदेश जा.क्र.२०२०/मशाका/जिनिक/आव्यप्र/कावि- दिनांक १३/०४/२०२०.

## परिपत्रक

ज्याअर्थी, जागतिक आरोग्य संघटनेने करोना (कोव्हीड-१९) या विषाणूमुळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणून घोषीत केलेला आहे. तसेच करोना विषाणूचा प्रसार भारतात, महाराष्ट्रतील शहरात गतीने पसरत आहे असे दिसून येत आहे. तसेच राज्य शासनाने करोना विषाणुचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करुन, सदर कायद्यातील खंड २, ३ व ४ मधील तरतूदीनुसार अधिसूचना निर्गमीत केलेली आहे. त्याबाबतची नियमावली तयार करण्यात आलेली आहे. तसेच भारत सरकार आरोग्य मंत्रालय, महाराष्ट्र शासन आरोग्य मंत्रालय यांनी जाहीर केल्याप्रमाणे करोनाग्रस्त रुग्णांचे इतर लोकांनी संपर्कात येऊ नये तसेच सार्वजनिक किंवा खाजगी ठिकाणी एकत्र येणे, थांबणे, चर्चा करणे, कार्यक्रमाचे आयोजन करणे, इ. बाबींमुळे या विषाणूचा संसर्ग व प्रादूर्भाव पसरण्याची शक्यता लक्षातघेता, सर्वसामान्य जनतेस व त्यांचे आरोग्यास धोका होत आहे.

सद्यस्थितीत करोना विषाणूच्या साथी व्यतिरिक्त अन्य विषाणूजन्य आजाराच्या साथीही जिल्हयात सुरु आहेत. तसेच विविध आजाराने ग्रस्त रुग्ण देखील दैनंदीन तपासणीसाठी खाजगी दवाखान्यात येत असतात. तथापी, माझेअसे निर्देशनास आणून देण्यात आले आहे की, काही खाजगी वैद्यकीय व्यवसायीक (डॉक्टर) आपली हॉस्पीटल/दवाखाने/क्लिनिक बंद ठेवीत असल्यामूळे सर्वसामान्य नागरिकांची गैरसोय होऊन शासकीय यंत्रणेवर भार पडत आहे.

तरी या परिपत्रकाद्वारे जालना जिल्ह्यातील सर्व नोंदणीकृत खाजगी वैद्यकीय व्यवसायीक (डॉक्टर) यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी आपली हॉस्पीटल/दवाखाने/क्लिनिक सलग बंद ठेवण्यात येवू नये, नसता संबंधिताविरुध्द साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ नुसार कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. तसेच संबंधीत हॉस्पीटलचे व वैद्यकीय व्यवसायीकांचे नोंदणी प्रमाणपत्र रद्द करण्याबाबतची कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल याची गांभिर्याने नोंद घ्यावी.

Rawt

**(रविंद्र बिनवडे)** भा.प्र.से.
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जालना**

जिल्हाधिकारी कार्यालय जा ल ना सत्यमेव जयते

**प्रत-(आवश्यक कार्यवाहीस्तव)**

१) पोलीस अधिक्षक, जालना.
२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. जालना
३) जिल्हा शल्य चिकित्सक, सा.रु. जालना
४) जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. जालना
५) सर्व नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायीक (डॉक्टर) जि.जालना यांना मार्फत जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. जालना
६) जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांना व्यापक प्रसिध्दीस्तव.

**प्रतिलीपी:-**

१) मा.विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना माहितीस्तव.
२) मा.संचालक, आपत्ती व्यवस्थापन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना माहितीस्तव.